# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७**

---

## * प्रेस नोट *

**❋ !! परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांसाठी मोफत नेत्र मूल्यमापन व तपासणी शिबीराचे आयोजन !! ❋**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील १३ आगारे व मुख्य इमारतीमधील कर्मचाऱ्यांसाठी तपशीलवार नेत्र मूल्यमापन व तपासणी शिबीराचे आयोजन मा. तुकाराम मुंढे, अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांचे संकल्पनेने करण्यात आलेले आहे. या शिबीराचा शुभारंभ आज पुणे स्टेशन आगार येथे झाला. या प्रसंगी कम्युनिटी आय केअर फौंडेशन, पुणे यांचेकडील डॉ. मनिषा गायकवाड, श्री. फरहान इनामदार, तसेच श्री. प्रांजल मेश्राम, श्री. सतिश गाटे, आगार व्यवस्थापक पुणे स्टेशन आगार, श्री. सुभाष गायकवाड, कामगार व जनता संपर्क अधिकारी तसेच आगाराकडील कर्मचारी वर्ग उपस्थित होता. या शिबीराव्दारे उपलब्ध झालेल्या संधीचा अधिकाधिक कर्मचाऱ्यांनी नेत्र तपासणी करून लाभ घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून याप्रसंगी करण्यात आले.

सदरचे शिबीर कम्युनिटी आय केअर फौंडेशन, पुणे यांचे सौजन्याने आयोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांचे तपशीलवार नेत्र मूल्यमापन व तपासणी नेत्र तज्ञांकडून महामंडळाचे आगारांचे व मुख्य कार्यालय इमारतीमधील आवारामध्ये मोबाईल आय क्लिनिकमध्ये होणार आहे. सदरचे शिबीर दि. १९/०४/२०१७ ते दि. १८/०५/२०१७ या कालावधीमध्ये प्रथम टप्यात पुणे स्टेशन आगारामध्ये दि. १९ ते दि. २२ एप्रिल, न.ता. वाडी आगारामध्ये दि. २४, २५ ते दि. २७, २८ एप्रिल, हडपसर आगारामध्ये दि. ०२ ते दि. ०५ मे, मुख्य कार्यालय इमारत दि. ०८ ते दि. १२ मे व स्वारगेट डेपो येथे दि. १५ ते दि. १९ मे, याप्रमाणे आयोजित करण्यात आलेले आहे. शिबीरामध्ये तपशीलवार नेत्र तपासणीसह वैद्यकिय सल्ला देण्यात येणार आहे. तरी सुरक्षित वाहतुक व्यवस्था पुरविणेचे संदर्भातील करावयाचे कामकाजाचे दृष्टीने महामंडळाकडील वाहतुक व वर्कशॉप विभागाकडील अधिकाधिक कर्मचाऱ्यांनी नेत्र तपासणी करून घेण्याचे आवाहन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांनी केले आहे.

**sd**

**सहव्यवस्थापकिय संचालक,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

मा. संपादक **दिनांक : १९/०४/२०१७**
दैनिक..........
यांजकडेस.........
महोदय,
वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.
मा. स. कळावे.

**sd**
**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७**

---

## * प्रेस नोट *

**❋ !! परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांवर गैरवर्तनास्तव निलंबन व खाते निहाय चौकशीची कारवाई !! ❋**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील कर्तव्य बजावित असताना त्यांचे आढळून आलेल्या गैरवर्तनाचे प्राप्त अहवालास अनुसरून या कर्मचाऱ्यांवर प्रशासनाकडून शिस्तभंगाची कडक कारवाईचे धोरण अवलंबण्यात आलेले आहे. त्यामध्ये आज नियोजित वेळेपेक्षा अगोदर बस मार्गावर मार्गस्थ करणेचे गैरवर्तनास्तव दोन सेवकांना, नियोजीत वेळेनंतर बस मार्गस्थ करणेचे गैरवर्तनास्तव तीन तसेच पैसे घेवून तिकिट न देउन अप्रमाणिक पणा करणाऱ्या एका सेवकास अशा एकुण सहा सेवकांना निलंबित ( चौकशी सस्पेंड ) करण्यात आलेले आहे. त्यामध्ये पाच वाहक व एका चालक सेवकाचा समावेश आहे. त्याचप्रमाणे तिकीट विक्री पेक्षा कमी रक्कमेचा भरणा करणेचे गैरवर्तन प्रकरणी एका वाहक सेवकाची खातेनिहाय चौकशी करण्यात येणार आहे.

---

मा. संपादक **दिनांक : २६/०४/२०१७**

दैनिक..........

यांजकडेस.........

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd**

**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७**

---

## * प्रेस नोट *

### ❋ !! परिवहन महामंडळाचे बनावट पास तयार करणाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल !! ❋

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे बनावट पास तयार करून महामंडळाची फसवणूक करणाऱ्या दोन इसमाविरूध्द आज फिर्याद नोंदविण्यात येऊन फौजदारी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

दिनांक २५/०४/२०१७ रोजी बस क्रमांक ५२५ मधील प्रवाशांचे तिकिट पासेस स्वारगेट ते गाडीतळ हडपसर या दरम्यान तपासणीस सर्वश्री.बबन काकडे, कोकणे, देशमुख चेक करित असतानां दोन मुकबधिर मुलांकडे नामे संदिप मोटे राहणार बिबवेवाडी व राजु भागेपल्ले राहणार विश्रांतवाडी यांचेकडे असलेले मुकबधिर पासेस संशयास्पद असल्याचे त्यांना आढळून आले. याबाबत या दोन्ही प्रवाशांकडे पासेसबाबत अधिक विचारणा केली असता त्यांनी सदरचे पासेस नियमबाहय रित्या तेजस थोरात रा. औंध व संदिप परदेशी राहणार मरकळ आळंदी यांचेकडून रू. १००/- फि व कागदपत्रे देऊन घेतल्याचे सांगितले ही माहिती व सदर पासचे अनुक्रमांकाच्या अनुषंगाने महामंडळाकडील पास विभागाकडील अभिलेख नोंदीनुसार तपासणी केली असता श्री. संदिप मोटे याचेकडील पास अनु.क्र. १४३० हा प्रियांका परटे राहणार बिबवेवाडी यांना दिलेला असल्याचे व त्याचा क्रमांक २२७० असल्याचे दिसून आले. श्री. राजु भागेपल्ले रा. विश्रांतवाडी याचेकडील पास अनु. ३०२७ अनु.क्र.४३७ व श्री. मोटे याचेकडे आढळून आलेल्या पास क्रमांक ३०२७ अनु. क्रमांक १४३० याचे तपशिलवार बारकाईने तपासणीत श्री. भागेपल्ले यांना देण्यात आलेल्या मूळ पासाची छायांकिंत प्रत काढून पास क्रमांक व नंबर यामध्ये बदल करून श्री.संदिप मोटे याचे नावाने बनावट पास तयार करून दिल्याचे दिसून आले. अशाप्रकारे तेजस थोरात रा. औंध व संदिप परदेशी यांनी बनावट पास तयार करून त्याची विक्री करून महामंडळाची फसवणुक केल्याचे आढळुन आल्याने त्यांचे विरूध्द हडपसर पोलिस स्टेशन येथे फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे. व त्यांच्यावर भा.दं.वि. कायदया अंतर्गत कलम क्रमांक ४२०,४६७,४६८,४७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

---

मा. संपादक **दिनांक : २६/०४/२०१७**

दैनिक..........

यांजकडेस.........

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd

**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७**

---

## * प्रेस नोट *

**❋ !! परिवहन महामंडळाचे बनावट पास तयार करणाऱ्या व वापर करणाऱ्याविरूध्द कायदेशीर कारवाई करणेबाबत महामंडळाचा पत्रव्यवहार !! ❋**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे बनावट पास तयार करून प्रवास करून महामंडळाची फसवणूक करण्याचा घटना प्रकार निदर्शनास आल्याने या संदर्भात तपास करून संबंधीताविरूध्द कायदेशीर करण्याबाबत हडपसर पोलिस स्टेशन यांना महामंडळाने पत्रव्दारे कळविले आहे.

दिनांक २७/०४/२०१७ रोजी सकाळी ११:४० मि. मार्ग क्रमांक १५१/५ पुणे स्टेशन ते आळंदी या दरम्यान बसवरील वाहक श्री. दिपक शंकर माने यांना बसमधून प्रवास करणाऱ्या दोन दिव्यांग (अंध/मुकबधीर) मुलींपैकी एका मुलीकडे प्रतिभा रोहिदास गच्छे राहणार विद्यानगर पुणे या मुलीचे नावे महामंडळाचे रजिस्टरवर नोंदीत असलेल्या प्रतिभा गच्छे नावाने असलेला संशयास्पद पास आढळला. सदरचा पास प्रतिभा गच्छे यांचे सहकार्याने या मुलीच्या नावे खोटा व डयुपलीकेट बनवून दिल्याचे तसेच सदरचा खोटा पास स्कॅनिंग करून बनविल्याची शक्यता असुन या संदर्भात अनेक व्यक्तिंनी सहकार्य करून महामंडळाची फसवणूक व आर्थिक नुकसान केल्याची बाब नाकारता येत नाही. तरी याबाबत यापुर्वी दि. २६/०४/२०१७ रोजी अशा प्रकारच्या घटनाप्रकारा बाबत महामंडळाकडून नोंदविण्यात आलेल्या तक्रारीस अनुसरून हडपसर पोलिस स्टेशनकडे नोदविण्यात आलेल्या गुन्हा रजिस्टर क्र. ४०५/२०१७ ला अनुसरून दि. २७/०४/२०१७ रोजीच्या घटना प्रकाराचा तपास करून संबंधीतावर कायदेशीर कारवाई करणे बाबत महामंडळाने सदर पोलिस स्टेशन यांना पत्राव्दार कळविले आहे.

---

मा. संपादक **दिनांक : २९/०४/२०१७**

दैनिक..........

यांजकडेस.........

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd**

**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७**

---

## * प्रेस नोट *

**❋ !! परिवहन महामंडळामध्ये प्रवासी बसेसची योग्यता प्रमाणपत्र तपासणी कार्यशाळा संपन्न !! ❋**

परिवहन महामंडळाचेवतीने महामंडळाचे वाहतुक व वर्कशॉप विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता प्रवासी बसेसची योग्यता प्रमाणपत्र तपासणी बाबतची कार्यशाळा दि. ०१ मे २०१७ रोजी आयोजित करण्यात आली. याप्रसंगी मा. डी. पी. मोरे, सहव्यवस्थापकिय संचालक, पीएमपीएमएल, मा. बी. आय. आजरी, प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे विभाग, श्री. ढोले, तांत्रिक सल्लागार, सीआयआरटी, पुणे, श्री. चंद्रकांत माने, परिवहन अधिकारी, श्री. विजयकुमार, टेक्निकल गायडन्स टाटा मोटर्स, श्री. श्रीनिवासन, टेक्निकल गायडन्स अशोक लेलॅंड, तसेच महामंडळाचे अधिकारी/कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

कायदेशीर तदतुदीस अनुसरून प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे महामंडळाचे बसेस योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करणेसाठी पाठविल्या गेल्यानंतर अनुषंगिक तांत्रिक पूर्तता कार्यवाही योग्यरित्या न झाल्याने त्या बसेस परत पाठविल्या जातात. त्यामुळे मार्गावर बसेस कमी उपलब्ध होवून प्रवाशांची गैरसोय होवून, महामंडळाचे आर्थिक नुकसान होते. हे टाळण्याचेदृष्टीने बसेस पासिंगला पाठविताना करावयाची तांत्रिक कामे, कायदेशीर तरतुदींचे अनुषंगाने करावयाचे कामकाज याबाबत तपशीलवार माहिती अधिकारी/कर्मचाऱ्यांना होणेचे हेतूने सदर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सदर कार्यशाळेमध्ये श्री. आजरी, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे विभाग यांनी सांघिक स्वरूपाचे कामकाज मन:पूर्वक करताना प्रत्येकाने जबाबदारीपूर्वक काम केले पाहिजे व सर्व तांत्रिक बाबी परिपूर्ण व योग्य कराव्यात असे सांगितले. श्री. माने, परिवहन अधिकारी यांनी योग्यता प्रमाणपत्र तपासणीचे (फिटनेस सर्टीफिकेट) अनुषंगाने करावयाचे महत्वपूर्ण कामकाज व महामंडळाचे बसमध्ये त्या अनुषंगाने दिसून येणाऱ्या त्रृटी व त्या दूर करण्याचे उपाय यासंदर्भात माहिती दिली. श्री. ढोले, तांत्रिक सल्लागार सीआयआरटी यांनी बसचे देखभाल व दुरूस्ती व पीएमपीएमएल बस सेवा विश्वासर्हता या अनुषंगाने घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. श्री. विजयकुमार, टेक्निकल गायडन्स टाटा मोटर्स यांनी तांत्रिक काम करताना वेगवेगळया भागांचे देखभाल दुरूस्ती करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. श्री. श्रीनिवासन, टेक्निकल गायडन्स अशोक लेलॅंड यांनी अपघात, आग यासारख्या उद्‌भवणाऱ्या परिस्थितीमध्ये तातडीचे उपाय योजना करण्यासाठी बसेसमध्ये आग प्रतिबंधक साधने, वस्तु तसेच हातोडी, ऑडियो सिस्टिम ठेवणेची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. माने, पासिंग अधिकारी पीएमपीएमएल, यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन मा. डी. पी. मोरे, सहव्यवस्थापकिय संचालक यांनी केले.

**sd**
**पासिंग अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

मा. संपादक — **दिनांक : ०२/०५/२०१७**
दैनिक..........
यांजकडेस.........
महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd**
**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७

---

**⁕ बेकायदा प्रवाशी वाहतुक करणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक, वाहन जप्तीची कडक कारवाई ⁕**

पुणे शहर व परिसरात प्रवाशांची गैरमार्गाने,बेकायदेशीर वाहतुक चालू असल्याच्या प्राप्त माहिती वरून अशा प्रकारची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाईची मोहिम गेल्या पंधरा दिवसापासुन सुरु करण्यात आलेली आहे. सदरची मोहिम पुणे महानगर परिवहन महामंडळाचे विशेष भरारी पथक,वाहतुक पोलिस व प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे कार्यालय यांनी संयुक्त मोहीम सुरु केलेली आहे.

या मोहिमेअंतर्गत स्वारगेट ते वारजेमाळवाडी या मार्गावर एकाच बस मधून मोठया प्रमाणात अनाधिकृत प्रवासी वाहतूक म्हणजे ५० प्रवाशांची एकाच वेळेस बेकायदेशीर वाहतुक करणाऱ्या इन्फोसिस कंपनीसाठी कर्मचारी वाहतुक करणारी बस क्र. एम.एच -१२, के.क्यु.- ७२४५ प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत जप्त करण्यात आलेली आहे. सदर बस चालक यांचेवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने खटला भरला आहे. तसेच या मोहिमे अंतर्गत गेल्या पंधरा दिवसांमध्ये अन्य ७६ वाहने जप्त करण्यात आलेली असून त्यामध्ये जीप, बलेरो, तव्हेरा, मारुतीव्हॅन, सहासिटर रिक्षा, टाटा मॅजिक, पॅगो रिक्षा या वाहनांचा समावेश आहे. या मोहिमे अंतर्गत २२६ वाहनांवर दंडात्मक कारवाई मध्ये रु. ४५२००/- रक्कम प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत वसूल करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई स्वारगेट,कात्रज, वारजे, डेक्कन,नगर रोड,वायुदल, सिंहगड रोड,कोथरुड,कर्वेनगर,हडपसर रोड,वाकड रोड हिंजवडी या मार्गावर करण्यात आलेली आहे.

---

**मा. संपादक** **दिनांक : ११/०५/२०१७**

**दैनिक..........**

**यांजकडेस.........**

**महोदय,**

**वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.**

**मा. स. कळावे.**

**sd**

**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७**

---

# * प्रेस नोट *

## ❋ !! परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांसाठी स्वारगेट आगारामध्ये मोफत नेत्र मूल्यमापन व तपासणी शिबीराचे आयोजन !! ❋

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील सर्व कर्मचाऱ्यांसाठी मोबाईल आय क्लिनिक व्दारे मोफत तपशीलवार नेत्र मूल्यमापन व तपासणी शिबीराचे दि. १९/०४/२०१७ पासून मा. तुकाराम मुंढे,(भा.प्र.से.) अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांचे संकल्पनेने आयोजित करण्यात आलेले आहे. सदरचे शिबीर कम्युनिटी आय केअर फौंडेशन, पुणे यांचे सहकार्याने आयोजीत करण्यात आलेले आहे. आज दि. ११/०५/२०१७ पासून सदर शिबीर महामंडळाचे स्वारगेट आगारात आयोजित करण्यात आलेले आहे. सदरचे शिबीर या पूर्वी पुणे स्टेशन, नतावाडी, हडपसर, तसेच मुख्य कार्यालय या ठिकाणी संपन्न होउन. आज रोजी स्वारगेट आगारामध्ये या शिबीराचा शुभारंभ मा. तुकाराम मुंढे, (भा.प्र.से.) अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांचे हस्ते येथे झाला. या प्रसंगी डॉ. परिक्षीत गोगटे, मुख्य विश्वस्त, डॉ. मनिषा गायकवाड, डॉ. एबीमचा, श्री. प्रांजल मेश्राम, श्री. अशोक धनगर, कम्युनिटी आय केअर फौंडेशन, पुणे तसेच महामंडळाकडील अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठया संख्यने उपस्थित होता.

या प्रसंगी मा. तुकाराम मुंढे,(भा.प्र.से.) अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांनी सदरचे शिबीर यापूर्वी महामंडळाचे चार ठिकाणी संपन्न झालेले आहे. सदरचे शिबीर महामंडळाचे उर्वरीत सर्व आगारांमध्ये राबविण्यात येईल, महामंडळाचे कर्मचाऱ्यांना नेत्र तपासणी अनिवार्य करण्यात येईल पुणे स्टेशन, हडपसर, नतावाडी, मुख्य कार्यालय, या ठिकाणी बऱ्याच कर्मचाऱ्यांनी नेत्र तपासणी करून घेतलेली असुन त्यामध्ये सेवकांना चष्म्याची गरज असल्याचे, मोतीबिंदु, काचबिंदु असल्याचे आढळून आलेले आहे. नेत्र तपासणी मध्ये आढळून आलेल्या नेत्रदोषा बाबत पुढील उपचार करून घेणेबाबत सेवकांना महामंडळाकडून प्रवृत्त करण्यात येताना. महामंडळाचे वैदयकिय सहाय योजना किंवा अन्य मार्गाने महामंडळाकडून सहकार्य करण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जाईल. नेत्र तपासणी शिबीरामुळे सेवकांचे वैयक्तिक आरोग्याबरोबरच सेवकाकडून महामंडळाच्या केल्या जाणाऱ्या कामकाजावर व पर्यायाने महामंडळाचे कामगिरीवर सकारात्मक परिणाम दिसून येईल असे सांगुन त्यामुळे कर्मचाऱ्यांनी अधिकाधिक या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. तसेच कम्युनिटी आय केअर फौंडेशन यांना मोफत शिबीर आयोजनव्दारे महामंडळास करीत असलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद दिले.

या प्रसंगी डॉ.परिक्षीत गोगटे, मुख्य विश्वस्त कम्युनिटी आय केअर फौंडेशन, पुणे यांनी सदर शिबीरास महामंडळाकडील कर्मचाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे. उर्वरीत कालावधीमध्ये कर्मचाऱ्यांनी या शिबीराचा लाभ घ्यावा त्याचा परिणाम महामंडळाचे कामगिरीवर निश्चित होईल व कम्युनिटी आय केअर फौंडेशन, पुणे यांचे महामंडळास भविष्यातसुध्दा सहकार्य राहिल अशी ग्वाही दिली.

---

मा. संपादक **दिनांक : ११/०५/२०१७**

दैनिक..........

यांजकडेस.........

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd**

**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७**

---

## ❋ मा. श्री. तुकाराम मुंढे यांचा नवी मुंबई येथील सर्वोत्तम कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनाकडून सन्मान ❋

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे विद्यमान अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक मा. श्री. तुकाराम मुंढे (भा.प्र.से.) यांना त्यांनी सन २०१६-१७ दरम्यान नवि मुंबई मनपा आयुक्त पदावर काम करताना केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनातर्फे मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र शासनामार्फत प्रथमच २० एप्रिल हा नगरविकास दिन म्हणून साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने दि. ०४/०५/२०१७ रोजीचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृहात आयोजित सोहळयात पुणे महानगर परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक श्री. तुकाराम मुंढे यांना नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त पदावर कार्य करताना कर संकलन व घनकचरा व्यवस्थापनात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रमास मा. रणजित पाटील (नगरविकास राज्य मंत्री), मा. आ. राज पुरोहित, मा. मिलिंद म्हैसकर (मुख्यमंत्र्यांचे सचिव), मा. मनिषा म्हैसकर (प्रधान सचिव नगरविकास २), श्री. विरेंद्र सिंह (आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय) व राज्यातील विविध महानगरपालिकांचे आयुक्त, महापौर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, नगराध्यक्ष हे उपस्थित होते.

---

**मा. संपादक** **दिनांक : ०५/०५/२०१७**

**दैनिक..........**

**यांजकडेस.........**

**महोदय,**

**वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.**

**मा. स. कळावे.**

**sd**

**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**